## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ५७४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–०९/०९/२०१६

**१) महीलेवर अत्याचार केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०८/०९/२०१६ रोजी १४.०० वा. दर. यातील फिर्यादी महीलेच्या नविन घराचे बांधकाम सुरु असुन यातील आरोपी बांधकामावर ठेकेदार आहे नवीन बांधकाम सुरु असलेल्या घराच्या समोरच फिर्यादी पिडीत महीला ही घरी एकटीच आराम करीत असतांना व तीचे पती सासु व दिर हे तंटा मुक्ती समितीच्या अध्यक्ष पदाचे निवडणुकी करीता घरा बाहेर असतांना आरोपीने फिर्यादीच्या घरात बांधकामावरील मशिन ठेवण्याचे बाहाण्याने आत प्रवेश करुन व समोरील छपरीतील रुमच्या दरवाज्याची आतुन कडी लावुन फिर्यादी ही आराम करीत असलेल्या बेडवर जावुन तीचे तोंड दाबुन तीच्यावर लैगिंक अत्याचार केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७६(१),४५०भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. कारंडे पो. स्टे. वरठी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) तरुणीचा विनयभंग . :–**

दिनांक ०८/०९/२०१६ रोजी १७.३० वा. दर. यातील फिर्यादी ही आपल्या शेतावरुन घराकडे येत असतांनी यातील आरोपीने नहराजवळ फिर्यादीचे हात पकडुन छातीवर हात ठेवुन विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३५४(अ) भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पो. स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**३) शिक्षाबंदी आरोपी रजेवर गेला असता फरार असल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०६/०९/२०१६ ते ०८/०९/२०१६ पर्यन्त यातील जन्मठेप शिक्षाबंदी आरोपी क्र. सी/९२७४ हा अभीवचन रजेवर गेला असता तो रजा उपभोगुन वेळेवर कारागृहात परत न येता फरार असल्याने सरतर्फे फिर्यादी मपोशि पिगंळे यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २२४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. तोडासे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक ०८/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली १०५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती १४ केसेस, अवैध प्रवासी ०१ केसेस तसेच ईतर वाहनांवरती ९० केसेस करण्यात आलेल्या आहेत

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.